नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३१४ Issue - 314 | वार रविवार दि. ५ एप्रिल २०२६ Blow- Sunday Date 5 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## चिमुरड्यांसह एकाच कुटुंबातील नऊ जणांचा दिंडोरीत अंत

### नियतीचा क्रूर खेळ, स्नेहसंमेलनावरुन येताना कार विहिरीत कोसळली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिंडोरी, नाशिक : येथील शिवाजीनगर परिसरात एका मंगल कार्यालयात खासगी क्लासचे स्नेहसंमेलन आटोपून घरी अर्टिगा कारने परत येत असताना जवळीलच शेतातील विहीरीत कार कोसळल्याचा प्रकार शुक्रवारी (दि. ३ एप्रिल) रात्री १० वाजताच्या सुमारास घडला. या भीषण अपघातात कारमधून प्रवास करणारे नऊ जण जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. एकाच कुटुंबातील नऊ जणांना अशाप्रकारे अपघातात प्राण गमवावे लागल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मृतांमध्ये दरगोडे कुटुंबातील दोन महिला आणि एक पुरुष यांच्यासह पंधरा वर्षाखालील सहा मुलांचा समावेश आहे. रात्री उशिरापर्यंत बचावकार्य सुरू होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिक जिल्ह्यात दिंडोरी शहरातील शिवाजीनगर भागात असलेल्या राजे बँक्वेट हॉल व मंगल कार्यालयात शुक्रवारी सायंकाळी एका खासगी क्लासचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते.

या संमेलनासाठी शहरासह आसपासच्या गावांतील विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

रात्री १० वाजेच्या सुमारास स्नेहसंमेलन आटोपल्यानंतर इंदोरे ता. दिंडोरी येथील एका कुटुंबातील नऊ जण अर्टिगा कारने घरी परतण्यासाठी निघाले. यावेळी मंगल कार्यालयाजवळच शेतात असलेल्या एका विहिरीत ती कार जाऊन कोसळली. या कारमध्ये दाम्पत्य, त्यांची कन्या असे एकाच कुटुंबातील तिघे जण, तर त्यांच्याच नात्यातील अन्य महिला, मुलगा, तीन मुली आणि लहानगी पुतणी असे दुसऱ्या कुटुंबातील मिळून नऊ जण होते.

ही घटना समजल्यानंतर नगरपंचायतीचे अग्निशामक दल, आपत्ती व्यवस्थापनाचे पथक तसेच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व मदतकार्यास सुरूवात केली.

ही विहीर पाण्याने भरलेली असल्याने मदतकार्यात अडथळे निर्माण होत होते. रात्री उशिरापर्यंत बचाव कार्य सुरू होते.

मृतांची नावं

सुनील दत्तात्रेय दरगोडे, ३४, वडील, रेशमा सुनील दरगोडे, २९, आई, राखी उर्फ गुणवंती सुनील दरगोडे, १०, मुलगी, आशा अनिल दरगोडे, ३४, आई, श्रुष्टि अनिल दरगोडे, १४, मुलगी, माधुरी उर्फ श्रद्धा अनिल दरगोडे, १३, मुलगी, श्रेयश अनिल दरगोडे, ११, मुलगा, श्रावणी अनिल दरगोडे, ११, मुलगी, समृद्धी राजेंद्र दरगोडे, ७, पुतणी

## चंदीगडच्या भाजप मुख्यालयावरील ग्रेनेड हल्ला प्रकरणात ५ जणांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंदीगड : चंदीगडमधील भाजप मुख्यालयावरील हल्ला प्रकरणात पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. पंजाब पोलीस आणि चंदीगड पोलिसांच्या संयुक्त कारवाईत पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. या हल्ल्याच्या कटात सहभागींना अटक करण्यात आलेल्या आरोपींना बलविंदर लाल ऊर्फ शम्मी, जसबीर सिंह ऊर्फ जस्सी, चरणजीत सिंह उर्फ चन्नी, रुबल चौहान आणि मनजीत ऊर्फ अभिजीत शर्माचा समावेश आहे.

पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी या प्रकरणाची माहिती देताना म्हटलं की एक ग्रेनेड आणि काही गोळ्या आरोपींपासून जप्त करण्यात आल्या आहेत. हल्ला करणाऱ्या २ मुख्य आरोपींची ओळख पटवण्यात आली आहे. त्या दोघांच्या अटकेसाठी छापेमारी सुरु आहे. प्राथमिक चौकशीत भाजपच्या कार्यालयावर हल्ला हा आयएसआयचा कट असल्याचं समोर आलं आहे. पोर्तुगाल आणि जर्मनीत बसलेल्या विदेशी हँडलर्सच्या इशाऱ्यावर हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्याचं सब मॉड्यूल आणि नेटवर्कचा वापर करण्यात आला.

चंदीगडच्या सेक्टर ३७ मधील भाजपा मुख्यालयात झालेल्या स्फोट प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आलं आहे.

पंजाब पोलिसांची काऊंटर इंटेलिजन्स शाखा आणि चंदीगड पोलीस यांनी संयुक्त अभियानात या घटनेत सहभागी असलेल्या पाच लोकांना अटक केली आहे. पंजाब पोलीस दलातील डीजीपी गौरव यादव यांनी शनिवारी चंदीगडमध्ये म्हटलं की प्राथमिक चौकशीत हल्ल्यात पाकिस्तानच्या आयएसआयचा हात असल्याचं समोर आलं आहे. ज्या नेटवर्ककडून हल्ला करण्यात आला ते विदेशात बसलेल्या हँडलर्सच्या इशाऱ्यावर काम करत आहे. हँडलर्सचं लोकेशन पोर्तुगाल आणि जर्मनी असल्याचं समोर आलं आहे.

डीजीपी गौरव यादव यांनी म्हटलं की हल्लेखोरांचं संघटित नेटवर्क होतं. जे वेगवेगळ्या पातळीवर काम करणाऱ्या सब-मॉड्यूल आणि कटआऊटचा सहभाग होता. त्यांचं काम शस्त्रांचा पुरवठा, ट्रान्सपोर्ट आणि हल्ला करणं हे होतं. हल्लयात सामील असलेल्या दोन मुख्य आरोपींची ओळख पटवण्यात आली आहे, त्यांची अटक करण्यासाठी छापेमारी सुरु आहे. एसएसओसीच्या एआयजी दीपक पारखे यांनी म्हटलं की चौकशीत काही बाबी समोर आल्याचं सांगितलं. अटक करण्यात आलेल्या आरोपींनी शस्त्र आणि ग्रेनेडची एक खेप दुसऱ्या स्थानापर्यंत पोहोचवण्याचं काम केलं होतं. शस्त्र अनेक जणांकडून शेवटी हल्लेखोरांपर्यंत पोहोचली होती. चंदीगड भाजप कार्यालयावरील हल्ल्याचा उलगडा झाल्यानं भविष्यात होणाऱ्या दहशतवादी घटना रोखण्यात यश येईल, असं पोलिसांनी म्हटलं.

राजकीय पक्षांच्या कार्यालयांची सुरक्षा वाढवली

चंदीगडमधील भाजप मुख्यालयावर झालेल्या हल्ल्यानंतर राजकीय पक्षांच्या कार्यालयांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पंजाब भाजप मुख्यालयात सीआरपीएफ तैनात करण्यात आली आहे. पंजाब भाजपचे कार्यकारी अध्यक्ष अश्वनी शर्मा यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

## राज्यात अवकाळीने २ लाख हेक्टरवरील पिकांना फटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे आतापर्यंत एकूण २९ जिल्ह्यांना फटका बसला असून राज्यभरात जवळपास दोन लाख चार हजार ८३५ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. नाशिक, धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसला आहे.

या अवकाळी पावसामुळे १४ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत हे नुकसान झाले आहे. यात केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, भाजीपाला, कलिंगड, डाळिंब, कांदा, संत्रे आणि द्राक्षांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. नाशिक जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी शनिवारी सिन्नर तालुक्यातील बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. मंत्री महाजन यांनी चिंचोली तसेच वडगाव पिंगळा या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचा आढावा घेतला. चिंचोली येथे शेतकरी रमेश नागरे यांच्या कांदा पिकाची तसेच आनंदीबाई काशिनाथ कांगणे यांच्या बीट व कांदा पिकाची त्यांनी पाहणी केली.

**२९ जिल्ह्यांत शेतकऱ्यांचं मोठं नुकसान**

**जिल्हावार नुकसान (१४ मार्च ते ३१ मार्च)** नाशिक : ३०,४४८ हेक्टर, अहिल्यानगर : २३,६३३ हेक्टर, जळगाव : २२,३६१ हेक्टर, धुळे : १४,८३२ हेक्टर, बुलढाणा : ८,५०७ हेक्टर, छत्रपती संभाजी नगर : ८,४४५ हेक्टर, सोलापूर : २,४३९ हेक्टर, पुणे : १,७८५ हेक्टर, जालना : १,६९२ हेक्टर, धाराशीव : १,४०७ हेक्टर,. अकोला : ९३१ हेक्टर, अमरावती : ६९६ हेक्टर. नांदेड : ५०२ हेक्टर, २९ जिल्ह्यांमध्ये एकूण नुकसान: १,२२,९९७ हेक्टर

## गोगांव येथील श्री कल्लेश्वर महाराज यांच्या यात्रेस सोमवारपासून प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तालुकाप्रतिनिधी/ अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील गोगांव येथे ग्रामदैवत श्री कल्लेश्वर महाराज यांची यात्रा सोमवार पासून सुरू होत असल्याची माहिती माजी सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी दिली.

दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुद्धा श्री कल्लेश्वर महाराजांची यात्रा मोठ्या उत्साहात साजरा होत असून दिनांक ६ एप्रिल रोजी संध्याकाळी ठीक ८ वाजता उच्चई (लहान रथ) श्री कल्लेश्वर मंदिरापासून हनुमान मंदिरापर्यंत नेला जातो , दिनाक ७ एप्रिल रोजी १२ वाजता रथावर कळसारोहण करण्यात येणार असून संध्याकाळी ८ वाजता रथोउत्सव होणार आहे. तसेच रात्री सांस्कृतिक कार्यक्रम कन्नड नाटक होणार आहे. दिनांक ८एप्रिल रोजी ३ वाजता जंगी कुस्ती चे आयोजन करण्यात आले आहे, व त्यादिवशी रात्री परत कन्नड नाटक होणार आहे. तरी सर्व भाविकांनी गोगांव च्या यात्रेनिमित्त येऊन जागृत देवस्थानाचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा आणि यात्रा पंच कमिटीला व ग्रामपंचायतला सहकार्य करावे,



प्रदूषणमुक्त यात्रा साजरी करून, सर्व शासकीय नियमाचे पालन करून यात्रा जल्लोषात साजरी करणार असे माहिती अध्यक्ष अशोक मुलगे व सचिव संजय सुरवसे यांनी सांगितले.

श्री कल्लेश्वर महाराज यात्रे निमित्त दिनांक ७ व ८ एप्रिल २०२६ रोजी महाप्रसदाची सोय करण्यात आल्याचे माहिती कलेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री मधुकर सुरवसे , खजिनदार प्रदीप जगताप, श्री कमलाकर सोनकांबळे व



देवस्थान कमिटीने सांगितले आहे.

'महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६'राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

## वर्तमान व भविष्यातील आव्हानांचा विचार करुन शैक्षणिक पद्धतीला नवी दिशा आवश्यक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : वैश्विक ज्ञानाचे भारतीयीकरण व भारतीय ज्ञानाचे वैश्विकरण करणे, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. केवळ ऐतिहासिक बाबींचा गौरवपूर्ण उल्लेख करुन आपण महान होणार नाही, तर यासह वर्तमान आणि भविष्याची वैश्विक आव्हाने लक्षात घेऊन त्यानुसार शैक्षणिक पद्धतीला दिशा द्यावी लागेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज येथे केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, विश्वेश्वरैया राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था, आयआयएम नागपूर आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, नवी दिल्ली या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने व्हीएनआयटी येथे 'महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६ : विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण'या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्राचे विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. याप्रसंगी शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, आयआयएम नागपूरचे संचालक भीमराया मेत्री, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु प्रशांत बोकारे, व्हीएनआयटीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष मदाभूशी मदन गोपाल, संचालक डॉ. प्रेमलाल पटेल, लघु उद्योग भारतीचे रवनीत खुराना या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज जग अत्यंत वेगाने पुढे जात आहे. पहिली औद्योगिक क्रांती १७६० मध्ये आली होती. त्यानंतरच्या आलेल्या तीन औद्योगिक क्रांतींचा काळ हा सुमारे अडीचशे वर्षांचा आहे. मात्र, मागील पंधरा वर्षांतच तीन औद्योगिक क्रांतींचा अनुभव जगाने घेतला आहे. बदलांची गती लक्षात घेतली नाही, तर आम्ही मागे राहू शकतो. या क्रांतीला गती देणारे 'एआय'आणि 'डीप टेक्नॉलॉजी'च्या विकासात भारतीयांचे अत्यंत मोलाचे योगदान राहिले आहे. आम्हाला शैक्षणिक धोरणातून असे मानव संसाधन घडवायचे आहे, ज्यात व्यक्तीमध्ये सर्वंकष विकासासह नैतिक व व्यावसायिक गुणांचे रोपणही अपेक्षित आहे. भौतिक, नैतिक, शारीरिक क्षमतेसह व्यावसायिक म्हणून ती व्यक्ती देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देणारीही ठरावी, अशी अपेक्षा आहे. जागतिक ज्ञान आणि भारतीय ज्ञान व्यवस्थेचा मेळ साधणारी आणि जागतिक आव्हानांचा सामना करणारी शिक्षण पद्धती आम्हाला विकसित करायची आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

मुख्यमंत्री म्हणाले, साठ टक्के नोकऱ्यांचे स्वरुप येत्या एक हजार दिवसांमध्येच बदलणार आहे. डीप टेक व एआय तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढेल, असा याचा अर्थ नाही. देशात संगणक क्रांती आली, त्यावेळीही अशीच चर्चा सुरु झाली होती. मात्र, आम्ही त्या क्षेत्रातही आमचा ठसा उमटविला होता. तंत्रज्ञान कधीच थांबत नाही. अशावेळी तंत्रज्ञानासोबत आपणही पुढे जाण्याची गरज आहे. विद्यापीठे तसेच शिक्षकांनी आजच्या काळात कुठले विषय सुसंगत व अनुरूप आहेत, याचाही विचार करण्याची गरज आहे. पंधरा वर्षात तीन औद्योगिक क्रांती येणार असतील, तर समाजात काहीही स्थायी राहू शकत नाही. प्रत्येकाला नव्या पद्धती स्विकाराव्या लागतील व शैक्षणिक क्षेत्र त्यासाठी अनुकूल करून घ्यावे लागेल आणि ज्ञानाचा प्रवाह पुढे न्यावा लागेल, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

विदेशी विद्यापीठांना आम्ही अनुकूल नव्हतो, असाही एक काळ होता. कारण त्यावेळी आम्ही त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नव्हतो. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. नवी मुंबईत आम्ही एज्युसिटी विकसित करत आहोत. त्यात अनेक विदेशी विद्यापीठाचे शिक्षण कमी खर्चात घेण्याची संधी आमच्या मुलांना उपलब्ध होणार आहे. आमच्या विद्यापीठांनीही या स्पर्धेत उतरून शिक्षणाचा तो स्तर गाठायला हवा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते एका स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे 'बेस्ट प्रॅक्टीसेस ऑफ गोंडवाना युनिव्हर्सिटी' या पुस्तिकेचे प्रकाशनही याप्रसंगी पार पडले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर यांनी आभार मानले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशभरातील शिक्षण व उद्योग क्षेत्राशी निगडित तज्ज्ञ आणि प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातून विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण या थीमवर आधारित महाराष्ट्र ज्ञान सभेचे हे आयोजन होत आहे.

# गरिबांचे रक्त पिणाऱ्या बिल्डरांना सोडणार नाही, प्रसंगी 'ईडी' कडे तपास देणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नाशिकमधील म्हाडा गृहप्रकल्पात गरिबांच्या हक्काची घरे हडपण्याचे प्रकरण अत्यंत गंभीर असून, यात कितीही मोठा 'मासा' असला तरी त्याला सोडले जाणार नाही. गरिबांचे हक्क हिरावून घेणाऱ्या आणि त्यांचे रक्त पिणाऱ्या बिल्डरांना आम्ही सोडणार नाही, प्रसंगी या प्रकरणाचा तपास 'ईडी'कडे सोपवू, असा सज्जड दम राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे दिला. नाशिक दौऱ्यावर असताना माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी म्हाडा घोटाळ्यावरून भूमाफियांना कडक इशारा दिला.

बावनकुळे म्हणाले की, गरिबांसाठी असलेली २० टक्के घरे बळकावली गेली आहेत. एकाच दिवसात जमिनीचे तुकडे पाडणे, नोंदी घेणे आणि नकाशे मंजूर करणे ही मोठी रिंग आहे. या प्रकरणासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली असून यात एक आयपीएस आणि दोन आयएएस अधिकारी आहेत. १५ दिवसांत अहवाल येईल. लाचलुचपत विभाग आणि भूमी अभिलेख विभागातून या घोटाळ्याची सुरुवात झाली असून, नाशिक विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना याप्रकरणी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. केवळ शिक्षा नाही, तर बिल्डरांकडून २० टक्के मालमत्ता रिकव्हर करून ती गरीबांना मिळवून देणार असेही ते म्हणाले.

**'माझी जाणीवपूर्वक बदनामी, दावे दाखल करणार'**

मागील दोन दिवसांत समाजमाध्यमांवर असलेल्या काही व्हीडिओबाबत बावनकुळे म्हणाले की, मी एवढंच म्हटलं होतं की ज्यांच्या फार्महाऊस आहेत. फार्महाऊससाठी कर्ज घेतले आहे. ज्यांनी मर्सिडीज गाड्या घेतल्या आहेत त्या शेतकऱ्यांनी कर्जमाफी मागू नये. नार्मल गाडी शेतकरी घेतो, ट्रॅक्टर घेतो, चार चाकी वाहन घेतो याला कुणी म्हणणार नाही; पण कर्जमाफी

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा इशारा**

मागताना धनदांडगे लोक आहेत. त्यांच्याकडे ऐपत आहे. तेवढेच जर पैसे आपण गरीब शेतकऱ्याला दिले तर शेतकऱ्यांच्या अधिक जास्त फायदा होऊ शकतो. गरीब शेतकर्याला कर्जमाफी मिळावी ही भावना होती. त्याचा आधार घेऊन अशा प्रकारचे खोटे व्हिडिओ तयार करणे आणि माझी समाजामध्ये प्रतिमा खराब करण्याचं काम सुरू आहे.

माझ्याकडे ८० एकर शेती असल्याचे खोटे आरोप केले जात आहेत. प्रत्यक्षात माझ्याकडे २८ एकरच जमीन आहे. जाणीवपूर्वक बदनामी केली जात असून याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. संबंधितांविरोधात १० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहे, या शब्दांत आपली भूमिका बावनकुळे यांनी स्पष्ट केली.

**'महसूल संदर्भातील पुरावे एसआयटीला द्या'**

अशोक खरात प्रकरणात १२ गुन्हे दाखल झाले असून यामध्ये एसआयटी तपास करत असून कोणीही सुटणार नाही. महसूल विभागातील अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. ज्यांच्याकडे पुरावे असतील त्यांनी ते एसआयटीला द्यावेत असेही ते म्हणाले.

दिंडोरी अपघात वेदनादायक

दिंडोरी येथील दुर्दैवी अपघातात ६ मुलांसह ९ जणांचा मृत्यू झाल्यानंतर संबंधित विहीर कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मृतांच्या कुटुंबियांना शासनाकडून मदत दिली जाणार असून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी उपाययोजना केल्या जातील. राज्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान' मोठ्या प्रमाणावर राबवले जात असून एप्रिलमध्ये १० तसेच १७ तारखेला तसेच पुढील महिन्यात शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. एनए अट रद्द करणे, तुकडेबंदी कायदा निरस्त करणे, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना यांसारखे निर्णय जनतेपर्यंत पोहोचवले जात आहेत. पुढील तीन महिन्यांत सर्व लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवण्याचे नियोजन असून नाशिकमधील आडगाव येथे सुमारे १५ योजनांचा लाभ देण्यात येत आहे असेही त्यांनी सांगितले.

**बारामती निवडणूक बिनविरोध व्हावी**

बारामती निवडणुकीसंदर्भात बोलताना ते म्हणाले, अजित दादांचा काँग्रेस-राष्ट्रवादीच्या प्रत्येक परिवाराशी संबंध आहे. त्यांचे सहवास आठवून ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी माझी भावना आहे. याबाबत नाना पटोले आणि इतर नेत्यांशी बोललो आहे. असेही त्यांनी नमूद केले.

# मुंबई उपनगरात जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी निवड चाचणी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रतिभा विकास केंद्राच्या माध्यमातून उपनगर जिल्ह्यातील गुणवंत खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच ऑलिम्पिक स्तरावरील स्पर्धांसाठी तयार करण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत थलेटिक्स, शूटिंग, टेबल टेनिस, बॉक्सिंग आणि कुस्ती या क्रीडा प्रकारांसाठी निवड चाचणी आयोजित करण्यात येणार असून, प्रत्येक क्रीडा प्रकारात सुमारे २० खेळाडूंची निवड केली जाणार आहे. इच्छुक खेळाडूंनी https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeeVvJ-mq0y4H2nšUXiF4tQiNy7UM0AdA-3BbMGfZdWTY2iEQA/viewform या लिंकवर १० एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी केले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने मुंबई उपनगर जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र कार्यान्वित करण्यात येत आहे. निवड झालेल्या खेळाडूंना तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून दर्जेदार प्रशिक्षण, पोषण व पूरक आहार, भोजन व्यवस्था, क्रीडा साहित्य व गणवेश, वैद्यकीय तपासण्या तसेच देश-विदेशातील प्रशिक्षणासाठी आवश्यक सहकार्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १० एप्रिल २०२६ असून निवड चाचणीची तारीख व स्थळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. उमेदवारांनी निवड चाचणीच्या दिवशी मूळ कागदपत्रे व ३ पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी पुढील संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा मार्क धरमाई - ८८९८०९०९०७. प्रीती टेमघरे - ९०२९२५०२६८, अभिजीत गुरव - ८१०८६१४९११, मनीषा गारगोटे - ८२०८३७२०३४, तसेच ई-मेल: mishan-lakshvedhmumsub@gmail.com यावर संपर्क साधावा. मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व पात्र खेळाडूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी केले आहे.

# महाराष्ट्रातील वाढवण बंदराकडे जाणाऱ्या चौपदरी द्रुतगती महामार्गाच्या बांधकामाचे 'एनएचएआय'ने दिले कंत्राट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एनएचएआय म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने महाराष्ट्रातील वाढवण बंदर ते महामार्ग ४८ वरील 'तवा' या गावादरम्यानच्या चार-पदरी द्रुतगती महामार्गाच्या बांधकामासाठी 'कंत्राट मंजुरी पत्र' जारी केले आहे. हा प्रकल्प 'अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम' (ईपीसी) पद्धतीनुसार बांधण्यात येणार आहे. या कामासाठी २,३६० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या महामार्ग बांधणीचे काम 'मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड' आणि 'मे. शिंदे डेव्हलपर्स प्रा. लि.' जॉइंट व्हेन्चरला देण्यात आले आहे. दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग (एनई४) आणि एनएच-४८ यांना जोडणारा हा द्रुतगती महामार्ग, राज्यातील विविध भागांना बंदराशी अखंडतेने जोडणी उपलब्ध करून देईल.

या प्रकल्पामध्ये ३२.१ किलोमीटर लांबीच्या 'प्रवेश-नियंत्रित' द्रुतगती महामार्गाच्या बांधकामाचा समावेश आहे. यासोबतच, ८०० मीटर लांबीचा दुहेरी बोगदा, दोन मोठे पूल, दोन 'इंटरचेंजेस', ३३ लहान पूल, सहा उड्डाणपूल, ८४ मोऱ्या , एक रेल्वे ओव्हरब्रिज, सात वाहनीय भुयारी मार्ग, २४ एलव्हीयूपी , चार एसव्हीयूपी आणि दोन 'मार्गांवरील सुविधा केंद्रे'यांची उभारणी करणे, हा देखील या प्रकल्पाचा भाग आहे. या प्रवेश-नियंत्रित द्रुतगती महामार्गाची सध्याची चौपदरी रचना भविष्यात आठ पदरी करण्यायोग्य असणार आहे.



वाढवण बंदराचा विकास प्रमुख बंदराच्या स्वरूपाप्रमाणे केला जाणार आहे. या बंदराची प्रस्तावित कंटेनर हाताळणी क्षमता २३.२ दशलक्ष टीईयू इतकी असणार आहे. या बंदरामध्ये २० मीटर इतकी नैसर्गिक पाण्याची खोली उपलब्ध असेलआणि या बंदराचे काम दोन टप्प्यांत कार्यान्वित केले जाईल. १५ दशलक्ष टीईयू इतकी कंटेनर हाताळणी क्षमता असलेला या प्रकल्पाचा पहिला टप्पा, २०३० पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

एकदा महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर, हा प्रवेश-नियंत्रित द्रुतगती महामार्ग प्रादेशिक जोडणीला चालना देईल. त्यामुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होईल आणि या प्रदेशात बंदराशी जलद जोडणी उपलब्ध करून देत असतानाच, दीर्घकालीन आर्थिक विकासालाही हातभार लागेल.

# कळंब येथे उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत अल्प पेन्शनमध्ये वाढ करण्यासाठी ईपीएस ९५ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे केंद्रीय श्रममंत्र्यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : ईपीएस ९५ सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने आपल्या अल्प पेन्शन मध्ये वाढ व्हावी या मागणीचे निवेदन मनसुख मांडिया श्रममंत्री भारत सरकार यांना कळंब उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्फत देण्यात आले या निवेदनात वृद्ध , अल्प पेन्शन धारकांनी आपल्या मागण्याकडे लक्ष वेधले पेन्शन वाढ मिळेल ही अपेक्षा बाळगून असलेले दररोज २०० ते २५० वृद्ध पेन्शनधारक मृत्यूमुखी पडत आहेत याकडे लक्ष वेधले वर्ष २०१३ मध्ये कोश्यारी



समिति ने रु.३०००/- मासिक पेन्शन,महंगाई भत्ता देणे विषयी शिफारस केली होती. परंतु ही पेन्शन सन २०१४ मध्ये कमीत कमी पेन्शन बिना महागाई भत्ता मात्र रु. १०००/-रुपये निर्धारित केली गेली. आज देशातील ३६ लाखाहून अधिक पेन्शनधारकांना १०००/- रुपयापेक्षा कमी पेन्शन मिळत आहे. वास्तविक पाहता पेन्शन रक्कम इतकी अल्प आहे की,ज्यामुळे औषध पाणी करणे शक्य नाही, वैद्यकीय सुविधा अभावी पेन्शनची आशा धरून बसलेले २०० ते २५० पेन्शनधारक मृत्युमुखी पडत आहेत. गेली नऊ वर्ष खालील मागण्यासाठी वृद्धांचा संघर्ष सुरू आहे कमीत कमी ७५००/- + महंगाई भत्ता मंजूर करण्यात यावा. ईपीएस - ९५ पेन्शनधारक आणि त्यांचे जीवन साथी यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार मिळावेत पेन्शन धारकांसाठी कसलाही प्रकारचा भेदभाव न करता सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार दि.४/१०/२०१६ व४/११/२०२२ च्या वास्तविक वेतनावर उच्च पेन्शनचा लाभ देण्यात यावा. गैर ईपीएस पेन्शन धारकासाठी रु.५०००/- मासिक पेन्शन देण्यात यावी. गत नऊ वर्षापासून संघर्ष समितीच्या वतीने शांतीपूर्ण मार्गाने पेन्शनधारकांच्या मागण्या घेऊन आंदोलन करण्यात येत आहे. यासाठी गठित संसदीय समितीने मागण्याबाबत सकारात्मक अहवाल दिला असल्याचे समजते. यानुसार केंद्र सरकारने निर्णय घ्यावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर ईपीएस ९५ कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष अच्युतराव माने, रामभाऊ कवडे, उत्तरेश्वर शिंगणापूरे, अरुण गायकवाड,बशीर पठाण, प्रभुलिंग झोरी, ज्ञानदेव पारेकर , लक्ष्मण काळे , रामा सोनवणे, वैजनाथ पवार, प्रकाश भाकरे, यांच्या सह्या असून या मागणीस ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ ,माधवसिंग राजपूत, संदीप कोकाटे यांनी पाठिंबा व्यक्त केला आहे.

# खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी एमपीएससी पूर्वतयारी अर्थसहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : पुणे येथील महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी एमपीएससी गट-ब (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या तयारीसाठी प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी रु. १०,०००/- व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी रु. ५,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ मध्ये एमपीएससी गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी ॖ.ारहरर्ीीी.ेस.ळप या संकेतस्थळावर अर्ज भरावा. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २७ एप्रिल २०२६ आहे. अमृत तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अमृतच्या लक्षित गटातील, (ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगूनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, हिंदू नेपाली, भूमिहार, लोहाणा, कानबी, इत्यादी) उमेदवारांना 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) गट-ब (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी उत्तीर्ण उमेदवारांना प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य' योजना राबविण्यात येत आहे. या योजनेविषयी सर्व सूचना व माहिती केवळ अमृतच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. अर्ज प्रक्रियेसंबंधी शंका असल्यास संबंधित जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक यांनी केले आहे.

# कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांचे सर्वच क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय : प्राचार्य भामरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : घोटी येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये मराठा विद्या प्रसारक संस्थेचे भूतपूर्व

**घोटी विद्यालयात कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांना अभिवादन**

सरचिटणीस कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य नितीन भामरे होते.व्यासपीठावर उपमुख्याध्यापक उल्हास पवार, पर्यवेक्षक हिरामण चौधरी, ज्येष्ठ शिक्षक सोमनाथ गिरी, अपर्णा उईके, निवृत्ती सदगर, मुख्य लिपिक भाऊसाहेब रणशेवरे, वरिष्ठ लिपिक जीवन शिंदे, अनिल गोवर्धने, वैशाली विधाते, ग्रंथपाल ओमकार सोनवणे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. साक्षी मोगल, शरयू पोतदार या विद्यार्थ्यांसह उपशिक्षिका सोनाली वाघ यांनी डॉ. पवार यांच्या







जीवन व कार्याचा आढावा घेतला.

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य नितीन भामरे म्हणाले की,डॉ. पवार यांनी शिस्त , गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीवर मविप्र संस्थेचा कारभार केला. संस्थेच्या संख्यात्मक व गुणात्मक विस्तारासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. डॉ. पवार यांचे सामाजिक, सहकार, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय साहित्य आदिंसह विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. सूत्रसंचालन पायल गिते यांनी तर आभार ऋतुजा शेळके हिने मानले.यावेळी संपत शेंगाळ, कैलास पाचोरे, राजेंद्र देवगिरे, गायत्री सूर्यवंशी, घनश्याम भालेराव, प्रकाश तांबे, सुधीर काळे, हेमंत झोले आदींसह शिक्षक-शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. इयत्ता आठवी तुकडी फ वर्गशिक्षिका वृषाली शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री भगीरथ भालके, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके शिवसेना शिंदे गटात

## उपमुख्यमंत्री एकनाथ यांच्या उपस्थितीत १२ एप्रिल रोजी प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेच्य लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके हो विठ्ठल परिवाराचे नेते भगीरथ भालके, हे दोघे १२ एप्रिल रोजी पंढरपुरात खास कार्यक्रमात होणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहेत..



पंढरपूर तालुक्यांमध्ये शिंदे गटाची ताकद वाढणार असल्याची दिसून येत आहे. राज्यातील प्रत्येक पक्षाने आपली ताकद वाढवण्यासाठी सुरुवात केली आहे. पंढरपूर तालुक्यात शिवसेना शिंदे गटाची मनवाची ताकद नाही. त्यामुळे तालुक्यात ताकत वाढवण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्ष केंद्रित केले आहे.

दोन महिन्यापूर्वी नगराध्यपदाच्या निवडणुकीमध्ये डॉक्टर प्रणिती भालके यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अप्रत्यक्ष मदत केलेली होती. तेव्हाच बालके शिवसेनेत जाणार अशी चर्चा होत होती. मात्र या चर्चेला नंतर पूर्णविराम मिळाला. आता पुन्हा पती-पत्नी भालके शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे. सत्तेत असल्याशिवाय कोणतेही काम होत नाही म्हणून भालके शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. भगीरथ भालके यांनी चार पक्ष बदलल्याचे दिसून येत आहे या अगोदर त्यांनी तीन पक्षांमध्ये प्रवेश केलेला आहे.

पंढरपूर शहर व तालुक्यामध्ये भालकी गटाचे चांगली ताकद आहे यामुळे पंढरपूर शहरांमध्ये शिंदे शिवसेनेचे ताकद वाढणार असल्याची दिसून येत आहे. याचा फायदा लोकसभा व विधानसभा निवडणुकीला शिंदे गटाला होणार आहे.

# करकंबमध्ये जळोली चौक येथील भर रस्त्यावर असलेल्या किराणा दुकानाचे शटर उचकटून एक लाख ८३ हजार ५५० रुपये मालाची चोरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : किराणा दुकान फोडले, चार चाकी वाहन भरून एक लाख ८३ हजाराला म** पळविला करकम येथील जळोली चौक येथील अर्कस यांचे भर रस्त्यावर असलेल्या किराणा दुकानाचे शटर उचकटून चार चाकी वाहन भरून एक लाख ८३ हजार ५५० रुपयांच्या मालाची चोरी करण्यात आली व ही घटना ३ एप्रिल ते ४ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडले आहे.

मागील आठवड्यात येथील डॉक्टर प्रदीप देशमुख यांच्या घरी चोरीची घटना घडली होती या घटनेला आठ दिवस उरले नाहीत तोपर्यंत जळवली चौक येथे अनिल अर्कस यांचे अन्नपूर्णा सुपर मार्केट नावाने किराणा मालाचे दुकान आहे या दुकानाचे मालक रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास दुकान बंद करून घरी गेले दरम्यान मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्याने दुकानाच्या पाठीमागील बाजूचे शटर उचकटून दुकानात प्रवेश केला व दुकानातील रोख रक्कम बारा हजार रुपये त्यामध्ये पाचशे, १००, ५०, रुपये दराच्या चलनी नोटा व चिल्लर, बारा हजार पाचशे रुपये किमतीचे फरेन लवली एकपेटी ४५ हजार रुपये किमतीचे केशर तेल बॉक्स ३००००१२००० रुपये किमतीचे एक बदामाची १५००० किलो जी गोणी दहा हजार पाचशे रुपये ची किमतीची कोलगेटच्या चार पेटी, १६,४०० किमतीची पॅराशुट दोन पेटी ३२५० रुपये किमतीचे संतूर साबण पेटी १.६ हजार दोनशे रुपये किमतीचा मिक्स साबण एक पेटी १५००० रुपये किमतीची केशर गोल्ड डबे ६.२६,००० ४०० रुपये किमतीची ज्वारी १६ कट्टे ३० किलोचे २५०० रुपये किमतीची लोणचे पेटी ७००० रुपये किमतीची शेंगदाणे कट्टा ५० किलो,४८०० रुपये किमतीची पावडर ४८ न २०००० रुपये किमतीचे एचपी सिलेक्ट कंपनीचा चहा पावडर ३५ किलो असा एकूण एक लाख ८३ हजार ५५० रुपये मुद्देमाल चोरीला गेला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे याबाबत गोपाळ अनिल आरस्कर राहणार करकम यांनी करकम पोलिसात फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शांतीनगर स्मशानभूमीत उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या स्थलांतराच्या मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाळासाहेब अहिरे/उल्हासनगर : शांतीनगर स्मशानभूमीत उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या स्थलांतराच्या मागणीसाठी खेमाणी परिसरात मूक निदर्शने करण्यात आली.

या प्रकरणी 'कायद्याने वागा लोकचळवळ'चे अध्यक्ष राज असरोंडकर हे १ एप्रिलपासून उपोषणाला बसले असून, महापालिका प्रशासनाकडून या आंदोलनाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. यामुळे आंबेडकरी समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

खेमाणी येथील संविधान शिल्पाजवळ झालेल्या मूक आंदोलनात अनेक सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता.

# कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये निर्भया पथकाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी निर्भया पथकाच्या वतीने विद्यार्थी विद्यार्थिनींना साठी मार्गदर्शना नंतर कार्यक्रम घेण्यात आला व महिलांच्या सुरक्षा बाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला होता.

निर्भया पथकातील पोलीस उपनिरीक्ष सुप्रिया रावण यांनी विद्यार्थिनींना त्यांच्या हक्का विषयी स्वसंरक्षणाच्या उपाययोजना तसेच आपत्कालीन मदत कशी मिळवायची याबद्दल सविस्तर माहिती दिली तसेच ऑनलाईन पद्धतीने मुलींना त्रास देण छेडाछेद करणे याबाबत प्रकारांमधून बचत करणारे मार्गही यावेळी समजावून सांगण्यात आले.

यावेळी पोलीस कॉन्स्टेबल निर्मला वाघमारे यांनी निर्भया पथकाचा मोबाईल नंबर देऊन कुठेही खेळाचे अथवा गैरप्रकार आढळल्यावर विद्यार्थिनींना कोणत्याही दबावाला बळी न पडता संपर्क करण्याचे आवाहन केले.



निर्भया पथकाच्या मार्गदर्शनामुळे थोडे ठेवतो का विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागून पुढील आणि गैरप्रकार रोखण्यास मदत होणार आहे. असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी व श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी या उपक्रमाचे कौतुक करून या विषयाचे महत्त्व अधोरेखित केले.

महिला व बाल विकास मंत्रालय भारत सरकार महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशा प्रमाणे एस एच इ-बॉक्स व कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक, मनाई निवारण अधिनियम पोस्ट २०१३ मध्ये जनजागृती होण्यासाठी महाविद्यालयात स्तरावर सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी समुपदेशक डॉक्टर संगीता पाटील, निर्भया पथकातील कॉन्स्टेबल शशिकांत सावंत, लक्ष्मण कुचेकर, महाविद्यालयातील विभागाचे प्रमुख डॉक्टर एस एम लंबे, डॉक्टर एस व्ही एकलारकर, डॉक्टर अनिल बाबर, प्राध्यापक दीपक भोसले सर्व प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते उपप्राचार्य प्राध्यापक जगदीश मुळेगावकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्राध्यापक गायत्री सरदेशमुख यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# सुंदरपूर जि. प. शाळेत स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील सुंदरपूर येथील जिल्हा परिषद शाळेत स्नेहसमेलन कार्यक्रम संपन्न झाला.




याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे अभिनय गाणी समूहगीत नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुक्त केले.आनंद मय वातावरणाने शाळेचे ग्राउंड दुमदुमून गेले होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विजय सोमवंशी यांनी केले,

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षिका भावसार आणि भावसार सर सुंदर से नियोजन केले होते शाळेचा आलेख उंचविण्यात भावसार सर व मॅडम . प्रयत्नशिल असून

त्यांचा हातून असेच शालेय विद्यार्थी चांगल्या पद्धतीचे घडतील व गावाचे नाव नक्कीच उज्वल करतील यात शंका नाही.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच प्रतीक्षाताई सोमवंशी , उपसरपंच लहानुभाऊ साळवे. सर्व सदस्य. शालेय समिती अध्यक्ष अनिल सोमवंशी. मा. सरपंच. नानासाहेब सोमवंशी. पोलिस पाटील दीपक साळवे. राजू सोमवंशी, शिवाजी सोमवंशी. हे उपस्थित होते.

सर्व विजेत्या विद्यार्थी ना ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला या वेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एचपीव्ही लसीबाबत निफाड तालुक्यात अल्प प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड उपजिल्हा रुग्णालयाचे कार्यरत वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांचे कडून मिळालेल्या माहितीनुसार नाशिक जिल्हात एच पी व्ही लस आता पर्यंत फक्त ५५० विद्यार्थ्यांनीना देण्यात आली असून .. निफाड तालुक्यात अत्यंत अल्प प्रतिसाद मिळत आहे, मानवी पॅपिलोमा व्हायरस म्हणजेच Human Papillomavirus (HPV) हा एक सामान्य विषाणू असून तो प्रामुख्याने त्वचा व श्लेष्मल त्वचेवर परिणाम करतो. काही प्रकारचे एच, पी व्ही, संसर्ग पुढे जाऊन गर्भाशय मुखाचा कर्करोग (उर्शींळ-लरश्र उरप-लशी) तसेच इतर काही कर्करोगांना कारणीभूत ठरू शकतात. या गंभीर आजारांपासून संरक्षण करण्यासाठी एच पी व्ही लस अत्यंत प्रभावी व सुरक्षित आहे.



एच पी व्ही, लस ही कर्करोग प्रतिबंधासाठी उपलब्ध असलेली सुरक्षित व प्रभावी लस आहे. ही लस विशेषतः ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी सर्वाधिक प्रभावी ठरते (लैंगिक आयुष्य सुरू होण्यापूर्वी देणे उत्तम).

काही परिस्थितीत मुलांनाही ही लस देणे उपयुक्त ठरते.

लसीमुळे गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.

समाजातील प्रचलित गैरसमज व सत्य:

गैरसमज: क्ष्जत लस घेतल्याने वंध्यत्व येते

सत्य: या लसीचा वंध्यत्वाशी कोणताही संबंध नाही. ती पूर्णपणे सुरक्षित आहे.

गैरसमज: ही लस फक्त विवाहित महिलांसाठी आहे

सत्य: ही लस किशोरवयीन मुलींना (९-१४ वर्षे) देणे सर्वात फायदेशीर आहे.

गैरसमज: लस घेतल्याने वर्तन बिघडते

सत्य: लसीचा व्यक्तीच्या वर्तनावर कोणताही परिणाम होत नाही.

गैरसमज: क्ष्जत संसर्ग दुर्मिळ आहे

सत्य: क्ष्जत हा अतिशय सामान्य विषाणू असून अनेक लोकांना आयुष्यात कधी ना कधी संसर्ग होऊ शकतो.

या सर्व बाबींचा सर्व नागरिकांनी व पालकांना आवाहन करण्यात येत की

पालकांनी आपल्या मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने HPV लसीकरणाबाबत योग्य माहिती घेऊन निर्णय घ्यावा. ही लस भविष्यातील गंभीर आजारांपासून संरक्षण देते. निफाड तालुका मुली हे निरोगी व कर्करोग सारख्या आजारापासून दूर ठेवण्यासाठी सहकार्य करावे

तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने ही आवाहन करण्यात येते की, पुढील तीन महिन्याचा कालावधी अजून बाकी असल्याने सर्व पालक, शिक्षक व नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत आरोग्य संस्थांकडूनच माहिती घ्यावी व आपल्या मुलांचे वेळेत व जास्तीत जास्त लसीकरण करून घ्यावे. असे आवाहन करण्यात आले आहे

**समाजसेवक गणेश अंकुशराव, बापू शिंदे यांनी जावून केली पाहणी**

# पंढरपुरच्या यमाई तलावात मृत माशांचा मोठ्ठा खच; समाजसेवक गणेश अंकुशराव यांचा खुलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरच्या यमाई तलावात हजारो मासे मृत्यूमुखी पडले आहेत. मृत्युमुखी पडलेल्या या माशांचा मोठ्ठा खच तलावाच्या काठावर आढळून आलाय.

यासंदर्भात पंढरपुरातील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष, समाजसेवक गणेश अंकुशराव व समाजसेवक बापु शिंदे यांनी यमाई तलाव परिसरात जाऊन पाहणी केली असता त्यांच्या निदर्शनास ही बाब आली. यानंतर गणेश अंकुशराव यांनी यासंदर्भात खळबळजनक खुलासा केला आहे.

यमाई तलावात अचानकंच एवढ्या मोठ्या संख्येने माशांचा मृत्यू कशामुळे झाला? असा प्रश्न उपस्थित करत गणेश अंकुशराव यांनी या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.





यमाई तलाव परिसर हा निसर्गरम्य परिसर असुन याठिकाणी विविध पक्षी व प्राण्यांचा वावर असतो. याचबरोबर अनेक पंढरपूरकर सकाळ संध्याकाळी या ठिकाणी कुटूंबासह फिरायला येत असतात. त्यामुळे याठिकाणी असलेल्या पर्यावरण व जैवविविधतेसोबतच, पशुपक्षी, व मनुष्य प्राणी यांच्या जिवीतासही मोठा धोका संभवू शकतो. त्यामुळे

आता या माशांच्या आकस्मिक मृत्यूच्या घटनेमुळे यमाई तलावातील पाणी दुषीत झालेय का? कशामुळे ही घटना घडली? तलावात कुणी विषारी पदार्थ तर मिसळले नाहीत ना? याची चौकशी करून प्रशासनाने हे मृत माशांचे पोष्टमार्टेम करुन त्यांचा मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला? याची तपासणी तातडीने करावी. या प्रकरणी जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी गणेश अंकुशराव यांनी केली आहे. जर तातडीने याचा शोध लागला नाही तर आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू करू असा इशारा ही त्यांनी दिला आहे.

# अखेर वाद मिटला.. आमदार अभिजीत पाटील यांनी पालकमंत्री व प्रशासनासह अंजनगाव खेलोबा येथील ग्रामस्थांचे मानले आभार

## छत्रपती शिवरायांचे स्मारक हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान असून, पुढील काळातही ते सर्वांना प्रेरणा देत राहील





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सध्या चर्चेत असलेला अंजनगाव खेलोबा येथे छत्रपती शिवरायांच्या स्मारक उभारण्याबाबत उद्भवलेला वाद अखेर समन्वयक साधून मार्गी लागला आहे. सोलापूर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी साहेब यांनी अत्यंत संयम आणि समन्वयाची भूमिका घेत, दिलेल्या तोडग्यावर दोन्ही बाजूंच्या नागरिकांनी एकमत दर्शवले. त्यांच्या या सकारात्मक हस्तक्षेपाबद्दल त्यांचे विशेष आभार मानतो...

याप्रक्रियेत सोलापूरचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे साहेब, पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी साहेब तसेच नवीन जिल्हाधिकारी कार्तिकेयन साहेब यांनीही समन्वय आणि एकोप्याची भूमिका बजावत परिस्थिती सुरळीत करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.. तसेच समाजातील दोन्ही बाजूंच्या नागरिकांनी दाखवलेला संयम आणि सहकार्य याबद्दलही आपण कृतज्ञ आहोत..

याप्रक्रियेत पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी साहेब, खझड अधिकारी अंजली कृष्णा मॅडम, खझड प्रशांत डगळे साहेब, पोलीस उपाधीक्षक देवळेकर साहेब, प्रांताधिकारी जयश्री अव्हाड मॅडम, तहसीलदार संजय भोसले, माढ्याचे पोलीस निरीक्षक राहुल शिंदे साहेब, कुर्डूवाडीचे पोलीस निरीक्षक अतुल मोहिते साहेब तसेच इतर प्रशासनातील अधिकाऱ्यांनी समन्वयाची भूमिका घेत शांतता राखण्याचे प्रयत्न केले.

मी देखील गेली तीन दिवस थांबून दोन्ही समाजात तेड निर्माण होणार नाही, दोन्ही समाजाची मत मतांतर जाणून घेत सामंजस्यपणे मार्ग काढण्याचे व समाजात एकोप्याच वातावरण ठेवण्यासाठी प्रयत्नशील होतो. माझ्यावर देखील टीका टिपण्या झाल्या परंतु समाजामध्ये वाद विवाद न होता, दोन्ही समाज एकत्र आणून सलोख्याचे वातावरण करण्याचा माझा प्रामाणिकपणे हेतू होता आणि तो कायम राहील असा उपदेश आमदार अभिजीत पाटील यांनी केले.

ग्रामस्थांनीही दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिका घेत वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. तथापि, काही बाहेरील घटकांच्या हस्तक्षेपामुळे या प्रक्रियेला विलंब झाला. तरीही सुमारे चाळीस ग्रामस्थ एकत्र बसून चर्चेद्वारे तोडगा काढण्यात यशस्वी झाले. यामध्ये फरांडे महाराजांसह सर्व संबंधितांनी एकमत साधत हा चिघळलेला विषय शांततेत सोडवला.

याप्रसंगी पालकमंत्री महोदयांनी छत्रपतींच्या स्मारकासाठी १कोटी रुपयांचा निधी जाहीर केला, त्याबद्दल आपण त्यांचे विशेष आभार मानतो. तसेच आमदार निधीतूनही १०लाख रुपये देण्याचा शब्द दिला असून, बसस्थानकाच्या जागेत बदल झाल्यास त्या ठिकाणी नवीन बसस्थानक उभारण्यासाठीही सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे.

छत्रपती शिवरायांचे स्मारक हे आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्थान असून, पुढील काळातही ते सर्वांना प्रेरणा देत राहील, याची आपण खात्री देतो. तसेच खेलोबा देवस्थानचा देखील आशीर्वाद कायम सोबत असून, मंदीरांचे परमपूज्य पूजारी, मानकरी आणि ग्रामस्थांचे योगदान मोलाचे होते.

आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील युवा तरुणांनी संयम आणि समन्वयाने निर्माण झालेला संघर्ष मिटवण्यासाठी पुढाकार घेतला, याबद्दल सर्वांचे आमदार अभिजीत पाटील यांनी आभार मानले..

# पत्रकारांची भूमिका ही माणुसकीला तारणारी असावी : डॉ. गजानन डोंगरवार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : सध्याचे जग हे वैज्ञानिक असूनही अंधश्रद्धाच्या आहारी गेलेले दिसते. असेच वातावरण राहीले तर विज्ञान व तंत्रज्ञान यांचा उपयोग कसा होईल ही शंका येते. म्हणून लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभानी आपली भूमिका ही माणुसकीला तारणारी ठेवावी असे प्रतिपादन सन्मानार्थी डॉ. गजानन डोंगरवार यांनी केले. ते सत्कारमुर्ती म्हणून आपले मत व्यक्त केले.

**डॉ. गजानन डोंगरवार यांचे प्रतिपादन : जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सन्मान सोहळा साजरा**

यावेळी मंचावर महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हा सल्लागार के. ए. रंगारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाध्यक्ष सतीश कोसरकर, माजी सरपंचा कुंदा डोंगरवार, सहसचिव कुलदिप राठोड आदी प्रामुख्याने उपस्थित होते. सदर सन्मान सोहळा दि. ०३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता, कृषी उत्पन्न बाजार समिती, अर्जुनीमोरगाव येथील हॉलमध्ये संपन्न झाले. प्रसंगी मंचावरील सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष व या कार्यक्रमाचे आयोजक व निमंत्रक प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी या सन्मान सोहळ्याची भूमिका विषद करताना म्हणाले- डॉ. डोंगरवार हे रुजविणारे व्यक्तिमत्त्व आहे. ते सामाजिक सलोखा निर्माण करणारे माणुसकीचा धागा बांधणारे सभ्य मानव आहेत. योग्य माणसाची या सन्मानासाठी निवड केली असेही त्यांनी आपल्या प्रास्ताविका नमूद केले. पत्रकारांनी निपक्ष, निर्भीड व न्यायाची आपली चालवावी. तसेच कुंदा डोंगरवार, श्री रंगारी यांनी सुध्दा आपले मनोगत मांडले. डॉ. गजानन डोंगरवार यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा कार्याचा कर्तृत्ववाचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याचे संचालन लालचंद मारगाये केले तर आभार डॉ. किशोर पुस्तोडे यांनी मानले. तर यशस्वितेसाठी संजय बडोले, मोरेश्वर धारगावे, सरगम शहारे, सुरेश सुरेश खोब्रागडे, विनोद शहारे, बाबुलाल नेवारे, स्वप्नील उके, नितेश राऊत, अभिषेक पवार, श्री. सोनाग्रे,विश्वरत्न रामटेके, संतोष रोकडे यांनी परिश्रम घेतले.

# लोहगाव येथील सार्थक गायकवाड बौध्दाचार्य परिक्षेत उत्तीर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : लोहगाव ता.तुळजापूर येथील युवा बौध्द उपासक सार्थक यल्लाप्पा गायकवाड हल्ली मुक्काम पुणे यानी भारतीय बौध्द महासभेच्या वतीने घेण्यात आलेल्या बौध्दाचार्य या परिक्षेत उत्तिर्ण झाला आहे.




भारतीय बौद्ध महासभा पुणे या धार्मिक संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या बौद्धचार्य या परीक्षेमध्ये सार्थक गायकवाड यानी सहभाग घेतला होता. सदर परिक्षेचा निकाला नुकताच लागला असून या बौध्दाचार्य परिक्षेत उत्तिर्ण होऊन त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

बौद्ध धम्माच्या प्रसार आणि प्रचार करण्यासाठी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय बौद्ध महासभा या धार्मिक संस्थेची स्थापना केली असून दरवर्षी या संस्थेच्या वतीने प्रशिक्षण शिबिर भरून बौद्धाचार्याची परीक्षा घेतली जाते.सार्थक गायकवाड हा इंजिनिअरिंगचे पदवी शिक्षण घेत घेत त्यांनी स्वतःला बौद्ध धम्म चळवळीशी,आंबेडकरी चळवळीशी जोडून घेतले असून भारतीय बौद्ध महासभा पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या बौद्धाचार्य परीक्षेत तो उत्तीर्ण झाला आहे.

त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल भारतीय बौद्ध महासभा पुणे यांनी आयोजित केलेल्या महिला धम्म मेळाव्यात सार्थक गायकवाड यास बौद्धचार्य प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभा पुणे या संस्थेचे अध्यक्ष के.बी.मोटघरे, डी.एन.धाईंजे, राजकुमार गायकवाड ,संदीप सोनवणे, बौद्धचार्य निलेश गायकवाड, आयुष्यमती दिपालीताई निलेश गायकवाड आदी मान्यवरासह संपूर्ण परिवार या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांच्य या यशा बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# महाराष्ट्रात ई-वाहनांना चालना; शासनाकडून प्रोत्साहनपर निधी वितरित : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवून पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अंतर्गत विविध घटकांना प्रोत्साहनपर निधी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. या निर्णयानुसार राज्यातील प्रमुख शहरी वाहतूक उपक्रमांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. बेस्ट (मुंबई), नागपूर महानगरपालिका पुणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका आणि ठाणे महानगरपालिका या सहा उपक्रमांना मिळून ₹४.५५ कोटींचा निधी देण्यात आला आहे. यामुळे शहरांमध्ये सार्वजनिक ई-वाहतूक अधिक सक्षम होणार आहे. ई-वाहनांच्या मागणीला चालना देण्यासाठी उत्पादक कंपन्यांना अनुदान देण्यात आले आहे.

**निष्पक्ष बातमी देणे हीच खरी पत्रकाराची ओळख**

# लोकसभा अध्यक्ष राष्ट्रीय जनगणना २०२७ मध्ये झाले सहभागी; डिजिटल स्व-गणना पूर्ण केली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज नवी दिल्लीतील आपल्या शासकीय निवासस्थानी 'स्व-गणने'ची प्रक्रिया पूर्ण करून जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात सहभाग नोंदवला.

या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना बिर्ला म्हणाले, की ही राष्ट्रीय जनगणना प्रशासकीय कारभारातील एका नव्या युगाची सुरुवात आहे.भारताच्या इतिहासात प्रथमच संपूर्ण जनगणना प्रक्रिया डिजिटल प्लॅटफॉर्मवर राबवली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. या बदलामुळे प्रत्येक नागरिकाला आपल्या कुटुंबाची माहिती स्वतः नोंदवण्याचा अधिकार आणि सुविधा प्राप्त झाली आहे.ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुरक्षित,अचूक आणि वापरकर्त्यांसाठी सुलभ असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

डिजिटल जनगणनेकडे होणारे हे स्थित्यंतर भारताच्या तंत्रज्ञान प्रगतीचे प्रतीक असून, यामुळे राष्ट्रीय डेटा अधिक अचूक आणि वास्तववादी असेल,असेही बिर्ला यांनी नमूद केले.

'जनगणनेतून जनकल्याण' हा संकल्प अधोरेखित करत, लोकसभा अध्यक्षांनी सर्व नागरिकांना या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रक्रियेत हिरिरीने सहभागी होण्याचे आवाहन केले. नागरिकांनी आपली माहिती स्वतः नोंदवावी आणि इतरांनाही त्यासाठी प्रोत्साहित करावे, जेणेकरून 'सशक्त आणि समृद्ध भारता'चा पाया रचण्यास मदत होईल,असे त्यांनी सांगितले.

या स्व-गणना प्रक्रियेदरम्यान भारताचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण हे नोंदणी प्रक्रियेत सहकार्य करण्यासाठी उपस्थित होते.

# युवा प्रदेश अध्यक्ष किशोर दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार मार्गदर्शन व नवीन पदाधिकारी नियुक्तीपत्र तथा आयडी वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शासकीय विश्रामगृह उमरगा, जिल्हा धाराशिव : धाराशिव जिल्ह्यातील उमरगा येथील शासकीय विश्रामगृहात लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याचे युवा प्रदेश अध्यक्ष मा.श्री.किशोर दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार मार्गदर्शन तसेच आयडी वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करताना मा.श्री.किशोर दादा पवार यांनी पत्रकारितेतील जबाबदाऱ्या, नैतिक मूल्ये आणि बदलत्या काळात डिजिटल माध्यमांची भूमिका यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, पत्रकार हा समाजाचा आरसा असून सत्य आणि निष्पक्ष बातमी देणे हीच खरी पत्रकाराची ओळख आहे.




यावेळी पत्रकारांनी आपले प्रश्न मांडले, तसेच सध्याच्या पत्रकारितेतील अडचणी, दबाव आणि आव्हाने यावर चर्चा करण्यात आली. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हक्कांसाठी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमात नव्याने सदस्यत्व घेतलेल्या पत्रकारांना अधिकृत ओळखपत्र (आयडी कार्ड) वाटप करण्यात आले. यामुळे पत्रकारांना ओळख आणि काम करताना अधिक सुलभता मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित राहणारे, लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा महिला अध्यक्ष श्रीमती पंचशीला कांबळे मॅडम व मराठवाडा अध्यक्ष श्री बालाजी सूर्यवंशी सर तथा लोकशाही पत्रकार संघ, धाराशिव जिल्ह्यातील कार्यकारणी जाहीर करण्यात आली. खालील प्रमाणे यादी.

१) धाराशिव जिल्हा अध्यक्ष
वीं श्रीशैलेश सिद्राम हत्ते
२) धाराशिव युवा जिल्हा अध्यक्ष
श्री राहुल दिगंबर थोरात
३) लातूर महिला जिल्हा अध्यक्ष
श्रीमती राऊ संजय पाटील
४) धाराशिव महिला जिल्हा अध्यक्ष
श्रीमती मैना नारायण वडणे
५) धाराशिव महिला जिल्हा उपाध्यक्ष
श्रीमती कविता राजेंद्र घोडके
६) लोहारा तालुका अध्यक्ष
श्री ज्ञानेश्वर बाबुराव कांबळे
७) उमरगा तालुका अध्यक्ष
श्री ओंकार सिद्धाप्पा कोंडे
८) युवा जिल्हा उपाध्यक्ष
श्री निखिल राजेंद्र घोडके

नवीन पदाधिकाऱ्यांचे खूप खूप अभिनंदन पुढील वाटचालीस शुभेच्छा = = आणि परिसरातील अनेक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे पार पडले, तर शेवटी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

एकूणच, हा कार्यक्रम पत्रकारांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरला असून संघटनेच्या कार्याला नवी दिशा मिळाल्याचे चित्र दिसून आले.